## नाशिक जिल्हा परिषद नाशिक
## वकील पॅनल करिता अटी व शर्ती

1) या करारनाम्याचा कालावधी नेमणुकीचे आदेशाचे दिनांकापासून 24/06/2026 ते 08/07/2029 कार्यरत असे पर्यत बंधनकारक राहील.

2) जिल्हा परिषद, न्यायालयीन प्रकरणे साधारणत: क्रमवारीने (रोटेशन प्रमाणे) देण्यात येतील. परंतू ही बाब मा. मुख्य कार्यकारी अधिकारी हे आवश्यकतेनुसार फेर बदल करू शकतात.

3) जिल्हा परिषद, नाशिक विरोधात कोणत्याही न्यायालयात पॅनल मधील वकीलांना केस चालविता येणार नाही.

4) नाशिक जिल्हा परिषदेने विहीत केलेनूसार मानधन देण्यात येईल. तालुका स्तरावरील न्यायालयातील केसेस चालविण्याकामी जिल्हा ते तालुका या दरम्यानचे न्यायालयातील केसेस चालविण्याकामी जिल्हा ते तालुका या दरम्यानचे प्रवास भाडे अनुज्ञेय राहील.

5) खर्चाबाबत त्याची पावती देयकासोबत जोडणे आवश्यक राहील. अशी पावती पडताळणी करताना त्यास मंजुरी देणे किंवा नाकारणे किंवा दुरूस्ती करून मंजुरी देणे याबाबतचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना राहतील. कोर्ट फी व स्टॅम्प डयुटीबाबत प्रमाणपत्र द्यावे.

6) कोणत्याही प्रकरणामध्ये वकील फी किंवा अनुषंगिक खर्च होत असल्यास कोणत्याही सबबी खाली खर्च करण्यास अग्रीम रक्कम दिली जाणार नाही.

7) प्रत्येकी प्रकरणी अतिरिक्त वकीलाची नेमणुक करणे किंवा प्रकरण कार्यवाहीत असतांना अन्य दुसऱ्या वकीलास चालविण्यास देणे किंवा प्रकरण सहमतीने आपसी करारानुसार अंतिम निकाली काढणे याबाबत अंतिम निर्णय मा. मुख्य कार्यकारी अधिकारी केंव्हाही घेऊ शकतील.

8) प्रकरणी वकालतनामा घेऊन चालविण्यास स्विकारल्यानंतर सर्व संबंधीत माहिती लिखीत स्वरूपात देण्यात यावी. अधिक आवश्यक माहिती कागदपत्राबाबत संबंधीत विभाग/शाखेस पत्र देऊन किंवा प्रत्यक्ष संपर्क करून उपलब्ध करून घ्यावी.

9) या विषयाची काही अडचण असल्यास कार्यालय प्रमुखांना लिखीत स्वरूपात पत्र देऊन किंवा प्रत्यक्ष भेटून सांगण्यात यावी.

10) कार्यालयाने नेमणुक केलेल्या वकीलाकडे दिलेली प्रकरणे कोणतीही सबब सांगुन परत करता येणार नाही आणि अपरिहार्य कारणास्तव अपवादात्मक स्थितीत प्रकरण परत करावयाचे कारण लेखी स्वरूपात कळविण्यात यावे.

11) जिल्हा परिषदेशी संबंधीत दोन न्याय प्रविष्ठ दाव्याचा निकाल विरोधात गेल्यास अथवा प्रकरणी वारंवार तारखेवर न्यायालयात गैरहजर राहिल्यास, प्रकरणाची कार्यालयास माहिती वेळोवेळी न दिल्यास, कामकाज असमाधानकारक वाटल्यास कोणतीही पुर्व सुचना किंवा लेखी पत्र न देता पॅनल मधुन कमी करण्याचे संपूर्ण अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहील.

12) जिल्हा परिषद, नाशिक वकील पॅनल मधील वकिलास कोणत्याही कारणास्तव पॅनल मधुन कमी केल्यास त्यांचेकडे देण्यात आलेली न्यायाप्रविष्ठ प्रकरणे पूर्ण माहिती, कागदपत्र, नस्ती पॅनलमधुन कमी केल्याचे पत्र मिळाल्यापासुन (10) दहा दिवसांचे आंत कार्यालय निर्देश करील त्या वकीलाकडे अथवा संबंधीत विभाग प्रमुख यांचेकडे परत करण्यात यावीत. माहिती कागदपत्रे, नस्ती परत केली नसले तर त्यांचे विरूध्द बार कौन्सिल वकील पंजीकरण विभाग किंवा अन्य न्यायालयीन विभागात या विषयाची तक्रार नोंदवुन आवश्यक सर्व उपाय करण्यांचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

13) पॅनलमध्ये निवड करण्यांचे तथा करारनाम्यांतील अटी व शर्तीमध्ये वेळोवेळी बदल करण्यांचे संपूर्ण अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

14) वकील फी अदा करण्याचे न्यायालयस्तर नुसार दर पुढील प्रमाणे.

| | न्यायालयाचे नाव | रक्कम रु. |
|---|---|---|
| वकील फी प्रती केस सर्व खर्च मिळून | 1) सर्वोच्च न्यायालय | रक्कम रु. 45,000/- |
| | 2) उच्च न्यायालय, मुंबई/ उच्च न्यायालय, औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर खंडपीठ/ महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण. | रक्कम रु. 20,000/- |
| | 3) दिवाणी जिल्हास्तर न्यायालय/दिवाणी कनिष्ठ स्तर न्यायालय/कामगार न्यायालय/औद्योगिक न्यायालय | रक्कम रु. 8,000/- |

| | | |
|---|---|---|
| लेखी कायदेविषय सल्ला/मत | अ स्तर | रक्कम रु. 3,500/- |
| | ब स्तर | रक्कम रु. 2,000/- |
| | क स्तर | रक्कम रु. 1,000/- |

| | | |
|---|---|---|
| जिल्हा परिषदेच्या वतीने कॅव्हेट दाखल करणे | अ स्तर | रक्कम रु. 25,000/- |
| | ब स्तर | रक्कम रु. 8,000/- |
| | क स्तर | रक्कम रु. 3,000/- |

ओमकार पवार (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक

Scanned with CamScanner

# नाशिक जिल्हा परिषद, नाशिक

## जिल्हा परिषद विधितज्ञ (वकील) नेमणुकीकरीता करावयाचा अर्ज

## (सन 2026 ते 2029)

येथे पासपोर्ट साईज फोटो चिकटवावा

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | अर्जदाराचे संपूर्ण नाव (मराठी) प्रथम आडनाव | | |
| 2 | अर्जदाराचे संपूर्ण नाव (इंग्रजी) प्रथम आडनाव | | |
| 3 | जन्म तारीख | | |
| 4 | निवासी व कार्यालयाचा पत्ता | | |
| 5 | शैक्षणिक अर्हता (कोणत्या विद्यापिठातुन पदवी प्राप्त केली विद्यापिठाचे नाव उत्तीर्ण वर्ष (सोबत साक्षांकित करुन छायांकित प्रती जोडाव्यात) | | |
| 6 | ॲडव्होकेट ॲक्ट, 1961 अंतर्गत नोंदणी क्रमांक व दिनांक | | |
| 7 | ई मेल आयडी व दुरध्वनी क्रमांक | | |
| 8 | अनुभव असल्यास न्यायालयाचे नाव | | |
| 9 | खालीलप्रमाणे कोणत्या न्यायालयात नेमणूकीसाठी अर्ज करावयाचा आहे (न्यायालयापुढे टिक ( ✓) करणे.) | | |
| | 1. मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली | | |
| | 2. मा. उच्च न्यायालय, मुंबई / खंडपीठ-औरंगाबाद/कोल्हापूर/ नागपूर | | |
| | 3. मा. महाराष्ट्र न्याय प्राधिकरण (मॅट) | | |
| | 4. मा. जिल्हा न्यायालय | | |
| | 5. मा. औद्योगिक न्यायालय | | |
| | 6. मा. कामगार न्यायालय | | |
| | 7. मा. दिवाणी न्यायालय तालुकास्तर | | |
| 10 | सद्यस्थितीत नाशिक जिल्हा परिषद पॅनलवर कार्यरत असल्यास त्याचा तपशिल | | |
| | न्यायालयाचे नाव | घेतलेल्या केसेस | जिल्हा परिषदेच्या बाजुने निकाल लागलेल्या केसेस |
| | 01. मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली | | |
| | 02. मा. उच्च न्यायालय, मुंबई / औरंगाबाद | | |
| | 03. मा. महाराष्ट्र न्याय प्राधिकरण (मॅट) | | |
| | 04. मा. जिल्हा न्यायालय | | |
| | 05. मा. औद्योगिक न्यायालय | | |
| | 06. मा. कामगार न्यायालय | | |
| | 07. मा. दिवाणी न्यायालय तालुकास्तर | | |
| 11 | वकील पॅनल मध्ये कोणत्या न्यायालयासाठी इच्छुक आहे. तो तपशिल (न्यायालयाचे नाव) | | |
| 12 | अर्जदाराची स्वाक्षरी | | |

Scanned with CamScanner